बी.व्होक अभ्यासक्रमांना
मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक: एनजीसी २०१८/(३२२/१८)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ मार्च, २०२०.

संदर्भ:
१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे पत्र क्र. संदर्भ क्र. सीए/१४६६ दिनांक: २०.०९.२०१९
२. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे पत्र क्र. जा. क्र. संलग्नता /टी-२/B.Voc./२०१९-२० दिनांक: २१.११.२०१९
३. उपकुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे पत्र क्र.रातुमनावि/म.वि.वि./१९/५४८२ दिनांक: २५.११.२०१९
४. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-२२७२/२०१९ दिनांक: ०७.१२.२०१९
५. उपकुलसचिव (शैक्षणिक उपविभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे पत्र क्र.संदर्भ क्र.शैक्षणिक/एमसीएम/२०१९-२०/४७८१-८२ दिनांक: २०.११.२०१९
६. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे पत्र क्र.संलग्नता/आय.सी.डी./२०१९-२०/१६७२ दिनांक: २८.११.२०१९
७. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र क्र.जा.क्र.शैक्षणिक/संलग्न-०३/बी.व्होक प्रस्ताव/२०१९-२०/१९६० दिनांक: १९.११.२०१९
८. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे पत्र क्र. जा.क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/८७७६
९. उपकुलसचिव, (अति. कार्य.), संलग्नता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे पत्र क्र.जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नता/५१८/२०१९

## शासन आदेश

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने National Vocational Education Qualification Framework या नावाचा कौशल्य विकास कार्यक्रम २०११ मध्ये सुरू केलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या वित्त

Scanned by CamScanner

विभागाने National Skill Qualification Framework ही योजना लागू केलेली आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणावर आधारित दिनदयाळ उपाध्याय कौशल्य केंद्रामार्फत व्यवसाय अभ्यासक्रम व कम्युनिटी महाविद्यालयांना मान्यता देण्याची योजना लागू केलेली आहे. सदर योजनेनुसार १ वर्षीय पदविका, २ वर्षीय Advanced Diploma व ३ वर्षीय B.VOC पदवी बहाल केली जाणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने Guidelines for introduction of Bachelor of vocation (B.VOC) Programme in universities & colleges under the National Skills Qualifications Framework (NSQF) निर्गमित केलेले आहेत. सदर मार्गदर्शक तत्वातील पात्रतेनुसार संदर्भाधीन विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांनी दिनदयाळ उपाध्याय कौशल्य केंद्रामार्फत सुरु केलेल्या अभ्यासक्रमास मान्यता मिळणेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अर्ज सादर केले होते. त्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाने B.Voc. अभ्यासक्रम व कम्युनिटी महाविद्यालयांना मंजूरी दिलेली आहे. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ या अभ्यासक्रमांना शासनाच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या उद्देशाने NSQF अंतर्गत बी.व्होक अभ्यासक्रम व कम्युनिटी कॉलेज मान्यता दिलेली आहे ते उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने त्यावर विद्यापीठाचे सनियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी व सर्व विद्यापीठांमधील कार्यपध्दतीत एकसूत्रता आणण्यासाठी निकष व कार्यपध्दती सुनिश्चित करण्यासाठी संबंधित विद्यापीठांच्या प्र.कुलगुरूंची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांनी अद्यापपर्यंत शासन मान्यतेसाठी प्रलंबित प्रस्ताव शासन मान्यतेसाठी फेरसादर केले आहेत.

या योजनेंतर्गत राज्यातील विद्यार्थ्यांना प्राप्त होणारी संधी व त्यातुन निर्माण होणारे रोजगारयुक्त कौशल्य आणि या अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणारा निधी तसेच, अशा अभ्यासक्रमांमध्ये त्या-त्या शैक्षणिक वर्षात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित या सर्व बाबींचा सकारात्मक विचार करता, सदर अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या शैक्षणिक वर्षापासून मान्यता दिलेली आहे, त्या-त्या शैक्षणिक वर्षापासून आवश्यकतेनुसार पूर्वलक्षी प्रभावाने शासन मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने सदर अपवादात्मक प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (४) (घ) मधील परंतुकानुसार प्राप्त अधिकारात सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील त्या-त्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाने शिफारशीत केलेले बी.व्होक अभ्यासक्रम व कम्युनिटी महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेप्रमाणे आवश्यकतेनुसार पूर्वलक्षी प्रभावाने सुरू करण्यास **कायम विनाअनुदान तत्वावर** मान्यता देण्यात येत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२५ | ९ | पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे सिध्दार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स ३४८, आनंद भवन, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१ | **B.Voc**<br>१) Banking And Financial Services<br>२) Retail | - |
| १२६ | १० | केळकर एज्युकेशन ट्रस्टचे विनायक गणेश वझे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मिठागर रोड, मुलुंड (पू.) मुंबई-४०० ०८१ | **B.Voc**<br>१) Tourism And Hospitality | - |
| १२७ | ११ | शिक्षण विकास मंडळाचे श्री.एस.एच.केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, निराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी, देवगड, सिंधुदुर्ग-४१६ ६१३ | **B.Voc**<br>१) Health Care<br>२) Hospitality And Tourism | - |
| १२८ | १२ | विद्या प्रसारक मंडळचे के.जी.जोशी कला महाविद्यालय, आणि एन.जी.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय क्रीक लॅण्ड चेंदानी बंदर रोड, ठाणे (प.) जि.ठाणे-४०० ६०१ | **B.Voc**<br>१) Sales And Marketing Management | - |
| १२९ | १३ | बॉम्बे सब-अर्बन आर्टस ॲण्ड क्राफ्ट एज्युकेशन सोसायटी एल.एस.रहेजा स्कूल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा रहेजा एज्युकेशन कॉम्प्लेक्स, छत्रपती शिवाजी क्रिडांगणाच्या समोर, खेरनगर, बांद्रा(पू.) जि.मुंबई-४०० ०५१ | **B.Voc**<br>१) Interior Design | - |
| १३० | १४ | रचना संसद अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर प्रभादेवी, २७८, शंकर घाणेकर मार्ग. प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५ | **B.Voc**<br>१) Interior Design | - |
| १३१ | १५ | झगडु सिंग चॅरिटेबल ट्रस्ट ठाकूर स्कूल ऑफ आर्किटेक्चर ॲण्ड प्लॅनिंग बी-ब्लॉक ठाकूर एज्युकेशनल कॅम्पस, श्यामनारायण ठाकूर मार्ग, ठाकूर गाव, कांदिवली (पू.) जि.मुंबई-४०० १०१ | **B.Voc**<br>१) Interior Design | - |

Scanned by CamScanner